(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. X / Issue – II ISSN 2277-8063

# कोरोना-19 चे असंघटित क्षेत्रातील घटकांवरील परिणाम व भारतीय राज्यघटनेची भूमिका

प्रा. पाटील प्रमोद जगन्नाथ राज्यशास्त्र विभाग माऊली महाविद्यालय, वडाळा

**Email : pramod24patil@gmail.com** Mob. 9552529337

---

**प्रस्तावना-**

कोविड 19 ही प्रामुख्याने अराजकीय समस्या आहे किंवा तशी ती दिसते. मात्र ही समस्या संपूर्ण लोकसंख्येला प्रभावित करतेच पण गरीब आणि उपेक्षितांना जास्त प्रभावित करते. कारण त्यांच्यासाठी सामाजिक अंतर राखणे एक मृगजळ आहे. परवडणारी आरोग्य सेवा उपलब्ध करणे ही असंभव कल्पना आहे.

कोरोना 19 चे असंघटित क्षेत्रावर अनेक विपरित परिणाम झाले. लोकशाही समाजव्यवस्थेत संघटित होण्याचे अनेक फायदे असतात. संघटनेच्या ताकतीतून विषमता, अन्याय, शोषण यांच्याविरुद्ध आवाज उठवता येतो. कामाच्यादृष्टीने आणि वैद्यकीय सोयी, कायदेशीर अधिकार, आर्थिक फायदे मिळविता येतात. संघटित कामगार वर्ग स्वतःच्या हितासाठी जागरूक असतो. परिणामतः मालक सरकार व इतरांकडून योग्य पद्धतीची वागणूक दिली जाते. या सर्वापासून असंघटित कामगार वंचित राहतात. सदर संशोधन पेपरमध्ये असंघटित क्षेत्रावर कोरोना 19 चे झालेले परिणाम तसेच भारतीय राज्यघटनेतील तरतुदी ची अमंबलजावणी याविषयी चर्चा करण्यात आली आहे.

**गृहीतके-**

1. कोरोना 19 चे असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या कौटुंबिक पातळीवर शिक्षण, आरोग्य यांसारख्या बाबींनी गंभीर स्वरूप धारण केले.
2. कोरोना 19 मुळे असंघटित क्षेत्रामध्ये बेकारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले.
3. कोरोना 19 मुळे कृषीक्षेत्रावरती परिणाम झाले.
4. कोरोना 19 मुळे राजकीय व्यवस्थेचा हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढला.
5. भारतीय राज्यघटनेतील मुलभूत अधिकाराचा विस्तार व काही मार्गदर्शक तत्वांचा समावेश मुलभूत हक्कामध्ये करण्याची आवश्यकता भासू लागली.

**उद्दिष्ट्ये-**

1. कोरोना 19 चे असंघटित क्षेत्रावर झालेल्या दूरगामी परिणामांचा अभ्यास करणे.
2. कोरोना 19 मुळे असंघटित क्षेत्रामध्ये बेकारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले का ते पहाणे.
3. कोरोना 19 चे असंघटित क्षेत्रातील प्रमुख उद्योग कृषी उद्योगावरील झालेले परिणाम अभ्यासणे.
4. कोरोना 19 मुळे राजकीय व्यवस्थेचा हस्तक्षेप अधिक प्रमाणात वाढला का ते पहाणे.
5. कोरोना 19 च्या पार्श्वभूमीवर भारतीय राज्यघटनेतील मुलभूत अधिकार विस्तार व मार्गदर्शक तत्वांचा समावेश, मुलभूत हक्कांमध्ये समावेश करणे आवश्यक आहे का? ते पहाणे.

**विषय प्रवेश -**

कोरोना 19 चा उगम चीनमधील वूहान प्रांतामध्ये झाला. अल्पकाळात त्याचा प्रभाव जगभर वाढला. जगभरातील 180 देशापेक्षा अधिक देशांमध्ये कोरोनाने आपला विस्तार केला. त्याचा सर्वाधिक परिणाम असंघटित कामगारावरती झाला.

आयएलओच्या ताज्या अहवालानुसार जिनिव्हा येथून प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार कोविड विषाणू रोखण्यासाठी भारतात करण्यात आलेल्या उपाय योजनांचा सर्वाधिक फटका असंघटित क्षेत्रातील कामगारांना बसणार आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या भारत, नायजेरिया, ब्राझील या देशांमध्ये सर्वाधिक आहे. भारतात एकूण लोकसंख्येपैकी 90% लोक असंघटित क्षेत्रात काम करतात.

2018 मध्ये भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या कामगार क्षेत्रात सहभागी आहे. त्यातील 81% लोकसंख्या अनौपचारिक क्षेत्रात कार्यरत होती. ज्याला असंघटित किंवा छाया अर्थव्यवस्था (शॅडो इकॉनॉमी) म्हटले जाते.

असंघटित क्षेत्राचा आकार 2005 मध्ये 86% होता. सन 2020 मध्ये कंत्राटी/ तात्पुरत्या कामासाठी भरती झालेले अनौपचारिक क्षेत्रातील कर्मचाऱ्याची संख्या वाढीस लागून कामगार शक्ती 92% पर्यंत वाढली.

रविंद्र वर्मा आयोगानुसार असंघटित कामगार क्षेत्रातील कामाच्या प्रकारात एकूण 105 उद्योग आढळतात. त्यातील प्रामुख्याने रिक्षावाला, हातगाडीवाला, टॅक्सीवाले, रस्त्यावरचे खेळी विक्रेते, रसवंतीवाले, भाजीविक्रेते, चहावाले, हॉटेल व्यवसाय, हातगाडीवाले, वेटर गॅरेजवाले, मॉलमधील कामगार, कागद-काच भंगार, जमा करणारे, न्हावी, घरगुती कामगार, बांधकाम क्षेत्रातील मजूर, अर्धकुशल, अकुशल कामगार, अशा हातावर पोट असलेल्या लोकांच्या रोजगारावर कोरोना 19 चा आत्यंतिक प्रभाव पडला.

भारतातील असंघटित क्षेत्रातील सुमारे 40 कोटी कामगार गरीबीच्या खोलगर्तेत लोटले जाण्याच्या धोका अधिक वाढला. त्यामुळे ग्रामीण भागाकडे परतण्याची वेळ आली. संयुक्त राष्ट्राशी संलग्न इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या रिपोर्टनुसार कोरोना व्हायरसच्या साथीमुळे अडीच कोटी रोजगार जातील.

1) कोरोना व्हायरसमुळे लॉकडाउनमुळे कामाचे तास कमी होणे, पगार कपात या गोष्टीमुळे बेरोजगारी वाढू शकते. याचा सर्वाधिक फटका विकसनशील देशांना बसेल.

2) भारतातील 1 कोटी 40 लाख बँकिंग पॉव्हर्टी (गरिब कामगार) यांची संख्या दुप्पट होण्याचा धोका अधिक प्रमाणात वाढला.

3) प्रवण सेन (भारताचे माजी सांख्यिकी तज्ञ) याच्या मते भारताचा विकासदर- 3 टक्के राहिल असे स्पष्ट केले. सन 2020-21 अर्थसंकल्पामध्ये 6 ते 6.5 टक्के इतका राहिला आहे. मात्र उत्पन्नातील असमानता सातत्याने विस्तारत आहे. देशाच्या उत्पन्नातील (जीडीपी) वेगाच्या तुलनेत राष्ट्रीय दारिद्राचा दर कमी होत नाही, हि विसंगती आढळते.

जीडीपी वाढीचा वेग समाजातील गरीबातील गरीब घटकांना होत नाही. संघटित उत्पादन प्रक्रियेतून हे घटक बाहेर फेकले गेले आहेत. साथीचे आजार प्रतिबंध कायदा, साथीच्या आजारावरील असंघटित क्षेत्रावरील परिणाम पाहण्यापूर्वी संबंधित कायद्यातील तरतुदी पाहणे आवश्यक आहे.

**साथीचे आजार प्रतिबंध कायदा (1897) व कायद्याचे असंघटित क्षेत्रातील कामगारांवरील परिणाम -**

साथीचे आजार प्रतिबंध कायद्याद्वारे वसाहतवादी सरकारला अनिर्बंध अधिकार मिळाले. गव्हर्नर-जनरल इंडिया यांच्या कौन्सिलमध्ये 'धोकादायक साथीच्या आजारांचा अधिक चांगला प्रतिबंध' करण्यासाठी हा कायदा मांडण्यात येत असल्याचे जॉन वुडबर्ग यांनी नमूद केले.

1) या कायद्याद्वारे सरकारला दिले जाणारे अधिकार, आजारांचा प्रसार रोखण्यासाठी आवश्यक आहेत. अशा महत्वाच्या परिस्थितीत लोकांनी सरकारच्या विवेक बुद्धीवर विश्वास टाकला पाहिजे. यावर त्यांनी भर दिला.

2) या कायद्याने वसाहतवादी सरकारला संशयित ताब्यात घेण्याचा, प्रादुर्भाव झालेली मालमत्ता, घरे नष्ट किंवा उद्ध्वस्त करण्याचा, जत्रा व यात्रांना मनाई करण्याचा व प्रवाशांची तपासणी करण्याचा अधिकार मिळाला.

3) या कायद्यानुसार केंद्र व राज्य सरकारला खात्रीपूर्वक अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या आधारे साथीचा रोग रोखणे अशक्य आहे. असे वाटल्यास जनतेवर किंवा एखाद्या व्यक्तीवर किंवा व्यक्तींच्या समूहांवर तात्पुरते नियम बंधनकारक करू शकते. किंवा तसे करण्याचे अधिकार एखाद्या व्यक्तीला देऊ शकते.

4) एखाद्या व्यक्तीला या आजाराचा प्रादुर्भाव झाल्याचा संशय तपासणी अधिकाऱ्याला आल्यास त्या व्यक्तीला रुग्णालयात तात्पुरत्या रहिवासात किंवा अन्य पद्धतीने इतरांपासून विभक्त ठेवण्याचे अधिकारही हा कायदा सरकारला देतो.

5) या कायद्याचा भंग केल्यास तो दंडनिय गुन्हा ठरविण्याची तरतूद या कायद्यात आहे. या कायद्याखाली कारवाई करणाऱ्या व्यक्तीला किवा अधिकाऱ्याला हा कायदा संरक्षण पुरवितो.

6) **या कायद्याखाली कारवाई करणाऱ्या व्यक्तीवरती खटला भरला जाऊ शकत नाही. किंवा कोणतीही कायदेशीर कारवाई केली जाऊ शकत नाही.**

**थोडक्यात साथीचे आजार प्रतिबंध कायद्याने राज्यसंस्थेला व्यक्तीगत पातळीव हस्तक्षेप करण्याचा अधिकार प्रदान केले. सद्सद्विवेक बुद्धीनुसार योग्य निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले. मात्र निर्णय प्रक्रिया राबविताना असंघटित क्षेत्रातील कामगारांवर त्याचे परिणाम काय होणार? याचा विचार केला, जातोच असे नाही.**

**असंघटित क्षेत्रावरील परिणाम -**

1) **कोरोनाच्या प्रभावामुळे अनेक कामगार केंद्रीत उद्योगांनी अकुशल कामगारांचा भरणा असंघटित क्षेत्रात मोठ्या प्रमाणात असल्याने तसेच असंघटित उद्योग कार्पोरेट उद्योगात येत नसल्याने त्यांना न्यायालयीन संरक्षण नसते. सामाजिक सुरक्षेशी त्याचा काही संबंध नसतो. प्रचंड लोकसंख्या परिणामता कामगार वर्गाची मोठ्या प्रमाणात उपलब्धता या वर्गाला सातत्याने शोषणाकडे ढकलत आहे.**

2) **असंघटित क्षेत्रातील कामगारांना किमान वेतन दिले जाते. कधी कधी ते त्या पेक्षाही कमी असते. वेतन महागाई दराशी कधीच संलग्न नसते. त्यामुळे या क्षेत्रातील कामगारांच्या दृष्टचक्रात अधिक भर पडत आहे.**

3) **कृषीक्षेत्राला सर्वाधिक फटका- कृषी क्षेत्रावरती लॉकडाऊनचा सर्वाधिक परिणाम झाला. असंघटित क्षेत्रातील भारतातील सर्वात मोठे क्षेत्र म्हणून कृषीक्षेत्र ओळखण्यात येते. जे मोठ्या प्रमाणात रोजगार पुरवते.** 2017 **मध्ये या क्षेत्राने देशातील एकूण श्रमशक्तीपैकी** 55 **टक्के रोजगार कामगारांना पुरवला. कोरोना** 19 **चा प्रभाव या क्षेत्रावर व या क्षेत्रावर आधारित उद्योगांवर अधिक झाला. ठळक परिणाम-**

1) **पालेभाज्या फळाच्या मागणीला घट**
2) **कांदा, उत्पादक शेतकऱ्यांवर परिणाम**
3) **मासे, कोळंबीच्या निर्यातीतून मोठ्या प्रमाणात उत्पादन मिळते त्यावरती परिणाम.**
4) **पोल्ट्री व्यवसाय कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे तसेच स्वाईन फ्लूमुळे उद्ध्वस्त झाला.**
5) **पोल्ट्रीशी पुरक उद्योग उद्ध्वस्त झाले. खाद्यनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी खरेदी थांबवल्यामुळे मका व सोयाबीन सारखी पिके घेणारे शेतकरी अडचणीत आले. महाराष्ट्रामध्ये अप्रत्यक्ष पोल्ट्री व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या** 10 **लाख लोकांना कोरोना** 19 **चा फटका बसला.**
6) **पर्यटन, वाहतुक क्षेत्र मंदीच्या सावटखाली आल्याने छोटे मोठे हॉटेल व्यावसायिक, किरकोळ विक्रेते, शॉपींग मॉल यासारख्या क्षेत्रामध्ये काम करणारे कामगार वर्ग आर्थिक अरिष्टामध्ये आले.**
7) **आंबा, द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना कोवीड** 19 **च्या प्रभावामुळे निर्यातीला मोठा फटका बसला.**
8) **निर्यात बंदीचा प्रभाव शेतकारी, व्यापारी, कामगारापासून उद्योजकांपर्यंत आला. कापड, यंत्रमाग, छोटे उद्योग, छोट्या मोठ्या इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज, आयटी सर्व्हिसेस या सर्वच उद्योगांवर मोठा परिणाम झाला.**
9) **सामाजिक सुरक्षेपासून वंचित- कोरोना** 19 **च्या प्रादुर्भावामुळे असंघटित क्षेत्रातील कामगार सामाजिक सुरक्षतेपासून वंचित राहिले. आंतरराष्ट्रीय संघटनेच्या** 1989 **च्या व्याख्येनुसार आजार, बाळंतपण, काम करताना होणाऱ्या इजा, बेरोजगारी, वार्धक्य, मृत्यु अशा प्रकारच्या समस्यांमुळे आर्थिक आणि सामाजिक प्रश्न निर्माण होतात. कामगारांच्या कामावर आणि परिणामतः त्यांच्या उत्पन्नावर परिणाम होतो. अशा परिस्थितीत समाजाकडून विविध सार्वजनिक उपक्रमाद्वारे समाजातील सभासदांना आणि त्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत, भरपाई, वैद्यकीय सुविधा या स्वरूपात संरक्षण देणे. याला सामाजिक सुरक्षा म्हणतात.**

**वरील सामाजिक सुरक्षतेची ही व्याख्या विकसनशील राष्ट्रासाठी अपूर्ण आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेत बहुतेकजनांना रोजगार मिळतो. असे गृहीत धरण्यात आले आहे. विकसनशील देशांच्या बाबतीत विचार केल्यास हे गृहीतक खोटे आहे. विकसनशील देशांमध्ये रोजगारांची अनिश्चितता, असुरक्षितता, तुटपुंजा आर्थिक मोबदला या बाबी संकट म्हणून उभ्या राहतात.**

**या सर्व परिणामांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, असंघटित कामगार त्यांचे कुटुंबिय, अल्पभूधारक शेतकरी हे आर्थिक लाभ आणि सामाजिक न्याय यांच्यापासून वंचित असतात. कामाच्या**

अनिश्‍चित वेळा, राहण्याच्या जागा, आरोग्याची सुविधा, स्वतःच्या कुटुंबाची सुरक्षितता, शिक्षण, असहाय्यसाठी आवश्यक उत्पन्न या बाबी प्राप्त होत नाहीत. ते सामाजिक न्यायापासून वंचित राहतात.

आजदेखील असंघटित कामगार राज्यघटनेतील समानता आणि मानवी प्रतिष्ठेने जगण्याची तरतूद यापासून वंचित आहे. या पार्श्‍वभूमीवर कोविड १९ व भारतीय राज्यघटनेची असंघटित कामगारांच्या कल्याणामधील भूमिका महत्वाची आहे. राज्यघटनेतील काही मुलभूत अधिकाराची अधिक व्याप्ती वाढवणे तसेच काही मार्गदर्शक तज्ञांचा समावेश मुलभूत हक्कामध्ये करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. कारण आपत्कालीन परिस्थितीत अन्नाचा, पिण्याचा पाण्याचा हक्क, उपजीविकेचा हक्क, रोजगाराचा हक्क इत्यादी कायदेशीरदृष्ट्या अंमलबजावणीस अशक्य असलेली मार्गदर्शक तत्वे मुलभूत अधिकारा इतकीच महत्वाची ठरतात. भारतात सर्वोच्च न्यायालयाच्या 300 हून अधिक निकालांमध्ये भारत हे कल्याणकारी राज्य असल्याचा पुनरुच्चार करण्यात आला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने कलम 21 जीवित स्वातंत्र्य अधिकाराचा अधिक विस्तृतपणे अर्थ लावताना जीवनाची व्याख्या आणखी विस्तृत केली.

केवळ प्राण्यासारखे अस्तित्व इतपत मर्यादित न ठेवता मानवी सन्मानाने जगण्याचा अधिकार अनेक निकालामध्ये स्पष्ट केला आहे.

1) चमेलीसिंग (1962) या खटल्याद्वारा निवारण्याचा हक्क.
2) पी युटीआर (1983) या खटल्याद्वारा निवाऱ्याचा हक्क
3) पश्‍चिम बंगाखेत मजदूर समिती (1964) आरोग्य सेवेचा हक्क
4) ए. पी. प्रदुषण नियंत्रण मंडळ (2001)- पिण्याच्या पाण्याच्या हक्क.

अन्न मिळण्याचा हक्क इत्यादी बाबींचा समावेश जीवीत हक्कामध्ये करण्यासंदर्भात राज्यसंस्थेला निर्देशित केले आहे.

मुलभूत हक्काच्या विस्ताराबरोबरच राज्यघटनेतील काही मार्गदर्शकतत्वाचा मुलभूत हक्कामध्ये समावेश होणे गरजेचे आहे. यामध्ये प्रामुख्याने-

कलम 47- पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे प्रामाणिक कर्तव्य असेल.

कलम 46- समाजातील दुर्बल घटकांना शिक्षण देणे आणि त्यांच्या आर्थिक हितसंबंधाचे रक्षण करणे.

कलम 41- नागरिकांना कामाचा, शिक्षणाचा अधिकार, बेकारी वार्धक्य, आजार व अपंगता यांनी पिडीत अशा लोकांना आणि ज्यांना अपराध नसताना निष्कारण हलाखीचे जीवन जगावे लागते अशा लोकांना सरकारी मदतीचा अधिकार मिळवून देणे.

या मार्गदर्शकतत्वांचा कोरोना 19 च्या पार्श्‍वभूमीवर मुलभूत अधिकारामध्ये समावेश करण्याच्या दृष्टीने राज्यसंस्थेने गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष-**

1) असंघटित कामगारांची भूमिका राष्ट्राच्या विकासातील महत्वची आहे. 1995 च्या नॅशनल अकाऊंट्स स्टॅटिस्टिकल रिपोर्टनुसार देशाच्या एकूण उत्पन्नापैकी 65% उत्पन्न असंघटित क्षेत्रातील कामगारांकडून मिळते. साहजिकच त्यांच्यावरती कोरोना 19 चे दूरगामी परिणाम होणे, बेकारी वाढणे राष्ट्रविकासाच्या दृष्टीने घातक ठरू शकते.

2) इटालियन विचारवंत ज्योर्जिओ आंगबेन यांनी अपवादात्मक अवस्था सिद्धान्त मांडला. ज्यामध्ये आपत्कालीन परिस्थितीत राज्य विस्तृत अधिकार संपादन करते. अपवादात्मक परिस्थितीत सरकारची सत्ता व अधिकाराची पातळी अधिक प्रमाणात वाढते. कोरोना 19 मध्ये असंघटित कामगारांच्या कल्याणाच्या दृष्टीने राज्यसंख्येने अपवादात्मक परिस्थितीचा लाभ घेऊन मार्गदर्शक तत्वांची मुलभूत अधिकारांप्रमाणे अंमलबजावणी करायला हवी.

3) **सर्वोच्च न्यायालयाने जिवीत स्वातंत्र्याच्या अधिकाराचा विस्तार करण्याच्यादृष्टीने वेगवेगळ्या खटल्यामध्ये दिलेल्या निर्णयाचा राज्यसंस्थेने गांभीर्याने विचार केला पाहिजे. साथीच्या रोगामध्ये असंघटित क्षेत्रातील कामगारांना त्याचा लाभ होवू शकतो.**

4) **कोरोना** 19 **चे कृषी क्षेत्रावरती प्रचंड परिणाम झाला. तरीही भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा कृषीक्षेत्र असल्याचे सन २०२० आर्थिक पाहणी अहवालानुसार स्पष्ट झाले. असंघटित क्षेत्रात सर्वात जास्त रोजगार निर्मितीचे व पुरवण्याचे क्षेत्र कृषी राहिले आहे.**

5) **असंघटित क्षेत्रातील कामगारांची नोंद करणे आवश्यक आहे. स्थलांतरीत मजुरांची** 10 **टक्के नोंद देखील नसल्याचे कोरोना** 19 **च्या पार्श्वभूमीवर स्पष्ट झाले.**

6) **साथीचा रोग प्रतिबंधक कायदा** (1897) **या कायद्यात सुधारणा करून संसदेने नव्याने साथीचे रोग प्रतिबंध कायदा समंत केला पाहिजे. तत्कालीन ब्रिटीश कौन्सीलने, वसाहतीक, साम्राज्यवादी दृष्टीकोनातून मानवी स्वातंत्र्य डोळ्यासमोर न ठेवता कायद्याची निर्मिती केली. कोरोना** 19 **च्या पार्श्वभूमीवर संबंधित कायदा राज्यसंस्थेला व्यक्तजीवनात अमर्याद हस्तक्षेप करण्याचा अधिकार देताना स्पष्ट होतो.**

**संदर्भ ग्रंथ -**

1) **डॉ. शिरसाठ सतिश- असंघटित कामगार, पुणे विद्यापीठ**, 2010.

**लेख**-

2) **साथीचा रोग कायदा** 1897- **आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली, दि**. 22 **एप्रिल** 2020.

3) **कुलकर्णी तुषार- कोरोना व्हायरस- कोव्हीड** 19 **मुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतोय**? **दि**. 31 **मार्च** 2020.

4) **पवार रोहित- कोरोना- सामाजिक व आर्थिक परिणाम**.

5) **महिला धोरण** (2013) **मसुदा- महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य**.